MHNG030035882026

# फौजदारी किरकोळ अर्ज/५९३/२०२६
# अंकुरकुमार रोहताश अग्रवाल वि.. महाराष्ट्र राज्य

## निशाणी क्र.१ खालील आदेश
(दिनांक २१ एप्रिल २०२६)

१. अर्जदार नामे **अंकुर कुमार रोहताश अग्रवाल** यांनी प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे धंतोली पोलीस स्टेशन/आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांनी अपराध क्र.४४०/२०२३ मध्ये फ्रिज केलेले खाते डिफ्रीज होवून मिळणेकरिता म्हणजेच त्यांना व्यवहार करण्याकरिता ऑपरेशनल करून तसेच त्या खात्यांवरील रक्कम फिर्यादीच्या खात्यात ट्रान्सफर करून मिळणेकरिता तसेच नगदी रोख, मोबाईल, दागिने मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने धंतोली पोलीस स्टेशन/आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे तपासी अधिकारी यांनी लेखी म्हणणे निशाणी क्र.४ वर दाखल केले आहे. तसेच सहाय्यक सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.६ वर सादर केलेले असून त्यांच्या म्हणण्यानुसार फिर्यादीचे पैसे आरोपींनी विविध बँक खात्यामध्ये वळविले असून फिर्यादीची फसवणूक केलेली आहे. तपासादरम्यान तपासी अधिका–याने विविध खात्यांवरील रक्कम गोठवून ठेवलेली आहे. सदर खातेचा तपशील परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. अर्जदाराचे कागदपत्र पडताळणी करून त्यानंतर योग्य तो आदेश होण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास आरोपींचे म्हणणे मागविण्यात आले. परंतु, वेळावेळी संधी देवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला. सर्व पक्षकारांचा युक्तीवाद ऐकण्यात आला व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ जप्त रकमेबाबत संगणीकृत स्टेटमेंट, अर्जदार यांचे ओळखपत्र इत्यादींच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल केल्या आहेत. तपासी अधिकारी यांनी दाखल केलेल्या लेखी म्हणण्यानुसार नगदी रू.३,५०,०००/– आरोपी जवाद बोरा याच्याकडून जप्त करण्यात आलेले आहे. तसेच विविध खात्यांवर असलेली एकूण ३१,७०,५६६/– इतकी रक्कम गोठवण्यात आलेली आहे. तपासी अधिका–याने सदर रकमेबाबत योग्य तो आदेश व्हावे ही विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणामधील आरोपींनी संगनमत करून फिर्यादीकडून रू.५,३९,५०,०००/– इतकी रक्कम रोखीने व बँक खात्यावर स्वीकारून त्याचा अपहार केल्याच्या तक्रारीवरून धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर येथे अपराध क्र.४४०/२०२३ भादंवि कलम ४२०, ४०६, ४१९, ४६७, ४६८, ४७१, १७१, १२०–ब सह ३४ दाखल करण्यात

आलेला आहे. यापुर्वी फिर्यादीला किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५७२/२०२४ मधील आदेशानुसार विविध बँक खात्यामधील एकूण रक्कम रू.४५,६८,९९८/– दिनांक ०८.०४.२०२४ रोजी दिल्याचे दिसून येते. तसेच किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२५३४/२०२४ वरील आदेशान्वये विविध बँक खात्यामधील एकूण रू.१७,३२,२८०/– इतकी रक्कम दिनांक २०.०६.२०२४ रोजीच्या आदेशानुसार दिल्याचे दिसून येते. तपासी अधिका–याने दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये एकूण ३१,७०,५६६/– रूपये खात्यामध्ये गोठवल्याचे दिसून येते. फिर्यादीच्या तक्रारीवरून दाखल झालेल्या नियमित फौजदारी प्रकरण क्र.२२७/२०२४ मधील दोषारोपपत्रान्वये आरोपींनी फिर्यादीची फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वरील नमूद रक्कम मागणी करण्यासाठी फिर्यादी व्यतिरीक्त् इतर कोणीही त्रयस्थ अर्जदार न्यायालयासमोर हजर झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. अश्या परिस्थितीमध्ये अर्जदारास काही अटी शर्ती घालून सदरची रक्कम परत करण्याचे आदेश पारित केले जावू शकतात.

५. मा. सर्वोच्च न्यायालयाने **सुंदरभाई अंबालाल देसाई–वि–स्टेट ऑफ गुजराथ,** (**Special Leave Petition**(**Cri**) 2745 **of** 2002) या न्यायनिवाडयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे तसेच जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या अनुषंगाने निर्देश दिलेले आहेत.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे केवळ जप्त रोख रक्कम व खात्यावरील रक्कम मिळावी यासंदर्भात पुरसिस फिर्यादीतर्फे निशाणी क्र.११ वर सादर केलेली असल्याने केवळ सदर रकमेच्या हद्दीपुरता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, तपासी अधिकारी यांचे लेखी म्हणणे व त्याअनुषंगाने दाखल केलेले कागदपत्र तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे वर नमूद न्यायनिवाडयातील निर्देशानुसार, अर्जदार यांचा अर्ज खालील अटी व शर्तीप्रमाणे मंजूर करण्यात येतो. करीता खालीलप्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. निरीक्षक, धंतोली पोलीस स्टेशन/आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की, अपराध क्र.४४०/२०२३ मधील परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केलेली बँक खाती ताबडतोब डिफ्रीज करून अर्जदार यांचे "Agrawal Trade Link Pvt. Ltd." चालू खाते क्र.४६०८००२१०००००७७४७, आयएसएससी कोड क्र.PUNB0460800, पंजाब नॅशनल बँक, शाखा–नंदनवन, नागपूर यांचे खात्यावर सदरची एकूण रक्कम (रक्कम रू.३१,७०,५६६) जमा करावी/अर्जदारांना ती वरीलप्रमाणे अदा करावी. त्याकरिता तसेच भविष्यामध्ये अर्जदाराने सांगितलेली/दिलेली लेखी माहिती खोटी/चुकीची आढळल्यास/निघाल्यास त्याची परतफेड करण्याकरिता पाचशे रूपयाच्या मुद्रांकावर तो त्याबाबतची नुकसानभरपाई करण्यास/देण्यास तयार आहे असे तसेच या आदेशातील अटी व शर्ती त्यामध्ये नमूद करून स्वत:च्या सहीनिशी लिहून दयावे.

३. तसेच आरोपी मोहम्मद जवाद बोरा याच्याकडून जप्त करण्यात आलेली रक्कम रू.३,५०,०००/- अर्जदारास तितक्याच रूपयाचे हमीपत्र स्वीकारून परत करण्यात यावी.

४. त्याकरिता अर्जदाराने या आदेशाची व अर्जाची प्रत बँकेच्या अवलोकनार्थ मेलद्वारे आणल्यास ते विचारात घ्यावेत. सदर/संबंधित बँकांना पुर्तता करण्याकरिता त्यांच्या इतर राज्यातील/जिल्हयातील बँकेच्या झोनल/प्रादेशिक कार्यालय यांच्याशी संपर्क अथवा पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास/त्यांना आवश्यकता वाटल्यास त्यांनी त्याप्रमाणेची सर्व पुर्तता लवकरात लवकर/विना विलंब करावी.

५. निरीक्षक, धंतोली पोलीस स्टेशन/आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांनी या आदेशाच्या अंमलबजावणी करिता त्यांच्या स्तरावरील नियमाप्रमाणे/आवश्यकतेप्रमाणे पंचनामा करून, परंतु, अर्जदारास विनाकारण फार त्रास न देता, लवकरात लवकर पुर्तता करावी व त्या अनुषंगानेची सर्व कागदपत्रे व अभिलेखाचे रितसर जतन करावे.

६. प्रस्तुत अर्जाचा आदेश व कागदपत्रांची प्रत नियमित फौजदारी प्रकरण क्र.२२७/२०२४ मध्ये समाविष्ट करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.04.21 16:43:15 +0530

दिनांक २१/०४/२०२६

नागपूर.

**( कौस्तुभ नागेश मराठे )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. १),

नागपूर.

परिशिष्ट क्र.१

| S No | Name | Bank Name | Balance Amount |
|---|---|---|---|
| 1 | Pooja Singh Chauhan | IDBI Bank LTD | 0 |
| 2 | Manda Suraj Rajesh Soni | Central Bank of India | 23057 |
| 3 | Falak Monish Badani | Axis Bank LTD | 25213 |
| 4 | Paras Jayesh Shah | Axis Bank LTD | 0 |
| 5 | Chandan Kumar | Axis Bank LTD | 0 |
| 6 | Rohit Kumar Shahu | State Bank of India | 25 |
| 7 | Sunita Satrughan Mandal | State Bank of India | 27997 |
| 8 | Wilmar International | IDFC Bank LTD | 0 |
| 9 | Wilmar International | IDFC Bank LTD | 0 |
| 10 | Suman Enterprises | Yes Bank LTD | 148 |
| 11 | Zamin Perfume Industrial Pvt Ltd | ICICI | 10726 |
| 12 | Mahendra Amaldhari V | ICICI Bank Ltd | 130 |
| 13 | Rudra Contruction | ICICI Bank Ltd | 0 |
| 14 | Sandeep Dubey | ICICI Bank Ltd | 0 |
| 15 | Seema Enterprises | ICICI Bank Ltd | 1250000 |
| 16 | Ujwala Shankar Burungale | BOM | 0 |
| 17 | Paras Jayesh Shah | Axis Bank Ltd | 50000 |
| 18 | Shree Gurudev Contruction | IDBI Bank Ltd | 16504 |
| 19 | Dharmendra Badrilal | Union Bank of India | 2329 |
| 20 | Abhishek Kumar Mishra | Bank of Baroda | 216 |
| 21 | Gulf Forex Travels Pvt Ltd | ICICI Bank Ltd | 0 |
| 22 | Wilmar International (Prop. Arup Kolita) | ICICI Bank Ltd | 0 |
| 23 | Sharannya Financial | Axis Bank Ltd | 0 |
| | Milind Ramchandra Chavan | Axis Bank LTD | 25361 |
| 24 | New Reliable Carz | ICICI Bank Ltd | 1000000 |
| 31 | Pravesh kumar singh | ICICI Bank Ltd | 191000 |
| 26 | Meghna Infracon (Prop. Jayantilal Hansaraj Lodha, Manju J. Lodha, Vikram Lodha, Meghna V. Lodha, Priyanka R. Lodha | Axis Bank Ltd | 168140 |
| 27 | Vikram Jayantilal Lodha & Meghna Vikram Lodha (Joint A/c) | HDFC Bank Ltd | 331860 |
| 28 | Naysaa Securities Ltd BSE OWN A C Forly Naysaa Securities Pvt Ltd (Prop. Vikram Jayantilal Lodha) | HDFC Bank Ltd | 47835 |
| 29 | Gulf Forex and Travels Pvt Ltd (Prop. Mohd. Hussain Koradia & Nadim Karim Kazi) | RBL Bank Ltd | 0 |
| 30 | Metro Enterprises ( Prop. Nikhil Babu Jagtap) | Yes Bank Ltd | 0 |
| 32 | Shivam Logistics ( Aman Kumar Pandey) | Axis Bank Ltd | 1 |
| 33 | Shivam Logistics | Yes Bank Ltd | 0 |
| 34 | Mangesh Raju Mandal | HDFC Bank Ltd | 2 |
| 35 | Artisan Petrochemicals | Yes Bank Ltd | 22 |
| 36 | Amarkumar Pandey | Axis Bank Ltd | 1 |
| | | **Total** | **31,70,566/-** |